वाचले :-

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०११ मधील सुधारीत तरतूदी.

२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि. ७ मे २०२१.

३. पदोन्नती समिती सभा दिनांक ०४/१०/२०२४ चा सभावृत्तांत.

४. मा.आयुक्तसो यांचा दिनांक- १०/१०/२०२४ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/०४/कावि/१४७६/२०२४
दिनांक १०/१०/२०२४

**विषय :- ' लेखापाल ' पदावरील पदोन्नतीबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर ' लेखापाल ' अभिनामाची रिक्त असणारी पदे पदोन्नतीने भरण्याकरीता दि.०४/१०/२०२४ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आलेली होती.

सदरच्या समितीने शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि. ७ मे २०२१ अन्वये दिलेले निर्देश विचारात घेवून पदोन्नतीपूर्व उपलेखापाल पदावरील कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, गोपनीय अहवाल, सेवाजेष्ठता, मत्ता व दायित्व आणि शिस्तभंग विषयक कारवाई इ. सेवाविषयक तपशील पडताळून रिक्त असणा-या पदावर खालील नमूद उपलेखापाल पदावरील कर्मचा-यांची दि.२५/०५/२००४ रोजीची स्थिती विचारात घेवून पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार लेखापाल अभिनामाच्या पदावर पे लेवल एस-१५ वेतनश्रेणी र.रु.४१८०० - १३२३०० या वेतनश्रेणीमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे.

| अ.क्र | उपलेखापाल कर्मचा-यांचे नाव | प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापनेचा विभाग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | श्रीम.साळुंखे सुरेखा सुनिल | ज्येष्ठतेनुसार | आय.टी.आय. मोरवाडी |
| २. | श्री.ठोंबरे मोरेश्वर बलभिम | ज्येष्ठतेनुसार | पर्यावरण अभियांत्रिकी |
| ३. | श्री.कोंडे विजयकुमार नानासाहेब | ज्येष्ठतेनुसार | अग्निशामक (सुरक्षा विभाग अति.पदभार) |
| ४. | श्री.शिर्के विवेक विनायक | ज्येष्ठतेनुसार | स्थानिक संस्था कर |
| ५. | श्री.कारकूड संजीव सुखदेव | ज्येष्ठतेनुसार | मुलेप |

| अ.क्र | उपलेखापाल कर्मचा-यांचे नाव | प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापनेचा विभाग |
|---|---|---|---|
| ६. | श्री.सानप मधुकर तान्हाजी | दिव्यांग प्रवर्ग (ज्येष्ठतेनुसार) | वायसीएमएच |
| ७. | श्रीम.थोरात उषा सतिश | ज्येष्ठतेनुसार | मुलेप |
| ८. | श्रीम.नेवासकर राजश्री कैलास | ज्येष्ठतेनुसार | मुलेप |
| ९. | श्री.शिवरात्री किरण सुधाकर | ज्येष्ठतेनुसार | ह क्षेत्रीय कार्यालय |
| १०. | श्रीम.साळी शुभांगी राजेंद्र | ज्येष्ठतेनुसार | लेखा |
| ११. | श्रीम.फुलसुंगे चंद्रकला दिनेशकुमार | ज्येष्ठतेनुसार | लेखा |
| १२. | श्री.कांबळे संजय तुकाराम | ज्येष्ठतेनुसार | क क्षेत्रीय कार्यालय |

सबब, उपरोक्त नमूद बाबी विचारात घेता, मी आयुक्त , पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ चे अधिन तसेच सदर पदोन्नती मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र. १०८७६/२०२१, रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र. १०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र. १०९०९ / २०२१ मध्ये होणा-या अंतीम निर्णयाच्या अधीन राहून उपरोक्त नमूद कर्मचा-यांना ज्येष्ठतेनुसार 'लेखापाल' या अभिनामाचे पदावर पे लेवल एस-१५ वेतनश्रेणी र.रु.४१८०० - १३२३०० या वेतनश्रेणीमध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात आदेशाच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यास प्रस्तूतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे. तसेच उपरोक्त पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचा-यांच्या नावासमोर स्तंभ क्र.४ मध्ये नमूद केलेल्या विभागामध्ये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

उपरोक्त कर्मचारी सध्या ज्या विभागात काम करीत आहेत, त्या विभागाचे विभागप्रमुखांनी प्रस्तूत पदोन्नतीचे आदेश वरील कर्मचा-यांना तात्काळ बजवावेत व त्याबाबत त्यांचे दिनांकीत स्वाक्षरीची पोहोच प्रशासन विभागाकडे पाठवावी.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधित कर्मचा-यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी४११०१८**

प्रति,
श्री/श्रीमती --------------------------
प्रत-
१. लेखा विभाग २. लेखापरिक्षण विभाग ३. प्रशासन टेबल क्रमांक ७, ९, १०, १२, १४, संगणक कक्ष
४. पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघ ५. पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी सेवकांची सह.पतसंस्था

६. सर्व संबंधित विभाग---------------------

प्र.सहाय्यक आयुक्त (सा.प्र.वि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८